यशवंत आंबेडकर यांचे नवबौद्ध समाजाच्या विकासातील योगदान - एक समाजशास्त्रीय अध्ययन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,
मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत पीएच.डी. (समाजशास्त्र) पदवीसाठी
सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा.

संशोधक

जोंधळे राहुल रामजी

मार्गदर्शक

डॉ.पी .के.मगर

संशोधक मार्गदर्शक व

समाजशास्त्र विभाग प्रमुख

शहीद भगतसिंग महाविद्यालय किल्लारी

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर.

2023.

यशवंत आंबेडकर यांचे नवबौध्द समाजाच्या विकासातील योगदान -एक समाजशास्त्रीय अध्ययन.

प्रस्तावना :-

प्रस्तुत संशोधन यशवंत आंबेडकर यांचे नवबौध्द समाजाच्या विकासातील योगदानाचा व त्यांच्या सामाजिक कार्याचा सुक्ष्म व विश्लेषणात्मक अभ्यास करणे हे उद्दिष्ट आहे. तत्कालीन समाज व्यवस्थेतील विस्कळीतपणा, अनिष्ट रुढी प्रथा परंपरा अंधश्रद्धा जाती धर्मावर आधारित विषमता, अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार म्हणजेच वर्तमानकालीन नवबौद्ध समाजावर लादल्या गेलेली धार्मीक , सामाजिक, राजकीय आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रातील बंधने, एकंदरीत माणसाकडे माणूस म्हणून न पाहता जाती, धर्माच्या नजरेतुन पाहुन त्यांचा सन्मानाने जगण्याचा हक्क व अधिकारच हिरावून घेतला गेला होता त्यामुळे हा समाज हजारो वर्षांपासून अनेक सामाजिक राजकीय आर्थिक शैक्षणिक समस्यांनी ग्रासला होता. या पार्श्वभूमीवर तत्कालीन सामाजिक संरचना व सामाजिक समस्यावरिल चिंतन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्म परिवर्तनाच्या माध्यमातून समतेवर आधारित बौद्ध धर्म स्वीकारुन या समाजाला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला पण धर्मांतरानंतर लगेचच दोन महिन्यांनंतर डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले आणि परत हा धर्मांतरीत नवबौध्द समाज पून्हा दिशाहीन अवस्थेकडे वाटचाल करते की काय असे वाटत असतानाच या दिशाहीन समाजाला परत योग्य मार्गावर आणण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र यशवंत आंबेडकर यांनी ह्या दिश्याहीन झालेल्या समाजाचे नेतृत्व करून भरकटलेल्या समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केला पण त्यांच्या सामाजिक राजकीय धार्मीक कार्यातील योगदानाची अपेक्षित दखल समाजशास्त्रिय अध्ययनात घेतली गेली नाही. यशवंत आंबेडकर यांच्या विधायक क्रांतिकारी व दुरगामी विचारांचा व कार्याचा सामान्य जनमानसाला संपूर्ण परिचय होणे आवश्यक आहे.

नवबौध्द समाजाच्या विकास व जडणघडणीत ज्यांनी ज्यांनी योगदान दिलेले आहे त्यात सर्वात महत्वपूर्ण स्थान यशवंत आंबेडकर यांचे आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीत शैक्षणिक धार्मीक व राजकीय चळवळीत यशवंत आंबेडकरांनी आपल्या विचारांचा व कार्याचा स्वतंत्र ठसा उमटविला आहे ही बाब कदापिही नाकारता येत नाही म्हणून प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी यशवंत आंबेडकर यांचे नवबौध्द समाजाच्या विकासातील योगदान: एक समाजशास्त्रीय अध्ययन. हा विषय निवडला आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात नवबौध्द समाजाच्या सामाजिक परिवर्तनात यशवंत आंबेडकरांची चळवळ ही गतिमान कृतिशील व परिवर्तनवादी चळवळ होती. त्यांच्या सामाजिक राजकीय शैक्षणिक धार्मीक क्षेत्रातील कार्याने या चळवळीला तात्विक व नैतिक मानवतावादी चौकट प्राप्त झाली. नवबौध्द समाजाच्या विकासाकरिता योगदान समजुन घेऊन आगामी काळात समर्थ पणे वाटचाल करण्यास बळ मिळावे हाच या संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

संशोधन विषयाची निवड :-

सामाजिक व धार्मीक क्षेत्रातील परिवर्तन चळवळीत यशवंत आंबेडकरांचे विचार दिशाहीन समाजाला दिशादर्शक ठरतील हे निश्चित आहे. नवबौध्द समाज आजही धार्मीक आचारणाच्या बाबतीत अतिशय उदासीन असल्याचे निदर्शनास येत आहे त्यामुळे या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून यशवंत आंबेडकरांचे कार्य समाजबांधवामध्ये नवचैतन्य व नवनिर्माणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

संशोधन विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

प्रस्तुत संशोधन विषय यशवंत आंबेडकर यांचे नवबौध्द समाजाच्या विकासातील योगदान : एक समाजशास्त्रीय अध्ययन. या विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विषद करताना महाराष्ट्रातील नवबौध्द समाजाची 1956 पासूनची सामाजिक,राजकीय, शैक्षणिक,धार्मीक क्षेत्रातील मुल्य व त्यांचा पारंपरिक दृष्टिकोन लक्षात घेऊन समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी प्रस्थापित परंपरा नाकारून नवसमाज निर्मितीसाठी भारतीय बौद्ध महासभा या मातृसंस्थेच्या माध्यमातून जीवनभर कार्य केले. पुर्वाश्रमीच्या महार समाजात रुढी परंपरा अंधश्रद्धा पोटजातीतील बंधने इ.कल्पना रुढ होत्या . अशा प्रतिकुल परिस्थितील यशवंत आंबेडकरांनी सामाजिक व राजकीय संघर्षात सक्रिय राहुन समाजाला क्रांतीसन्मुख बनवण्यासाठी अविरतपणे झटले सामाजिक आचारविचार प्रबोधन यांच्या समन्वयातून भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून एक धार्मीक आचारसंहिता निर्माण करून दिली. हाच केंद्रवर्ती विचार संशोधनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी पुरेसा ठरतो.

प्रस्तुत विषयाची सैद्धांतिक पार्श्वभूमी :-

प्रस्तुत संशोधनाची सैद्धांतिक पार्श्वभूमी स्पष्ट करताना या विषयाची सैद्धांतिक भुमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. यशवंत आंबेडकर यांचे सामाजिक कार्य महत्वपूर्ण राहिले आहे. त्यांचे एकुण जीवनकार्याचे ध्येय सामाजिक,राजकीय,आर्थिक,शैक्षणिक क्षेत्रात वंचित राहिलेल्या पूर्वाश्रमीचा महार व वर्तमानकालीन नवबौद्ध समाजाला विकासाच्या वाटेवर आणने हेच राहिले आहे. प्रस्थापित व्यवस्थेला छेद देऊन नवीन समाजव्यवस्था निर्माण करणे हे त्यांच्या कार्याचे अंतिम उद्दिष्ट राहिले आहे. प्रस्तुत विषयाची हीच मध्यवर्ती कल्पना असून. नवबौध्द समाजाचा विकास हेच आपल्या जीवनाचे मिशन मानले त्यांचे हे कार्य एक सामाजिक चळवळ म्हणून पुढे आले आहे. त्यामुळे त्यांच्या एकूण सामाजिक चळवळीचा सैद्धांतिक दृष्टिकोनातून अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून यशवंत आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तन चळवळीला अनेक अनुयायी लाभले व ते आजतागायत चळवळीचा प्रचार व प्रसार करत आहेत. कोणत्याही सामाजिक राजकीय चळवळी या आकस्मिक उदयास येत नसतात तर त्यामागे ठराविक परिस्थिती व विचारधारा कारणीभूत असते. चळवळ यशस्वी होण्यासाठी जसा जनसमुदाय आवश्यक असतो तसेच त्या चळवळीला दिशा देणारा नेता पण असणे आवश्यक असते. जेव्हा एखाद्या समाजावरील अन्याय पराकोटीला गेलेला असतो तेव्हा मानवी व्यवस्थेपुढे प्रचंड आव्हाने उभी होतात तेंव्हा आशा महान सामाजिक चळवळी उदयाला येतात. सामाजिक चळवळीची धारणा सामाजिक चेतनेवर आधारित असल्यामुळे चळवळीचा आरंभ हा प्रचलित समाज व्यवस्थेत बदल घडवून आणणे हा या पाठीमागचा मुख्य हेतू असतो. समाजशास्त्रात साधारणतः तीन स्वरूपाचे प्रारुप संदर्भात्मक असुन त्यातील संघर्षात्मक प्रारुपाचा वापर संशोधनात आधारभूत म्हणून वापरण्यात येणार आहे. या अंतर्गत सापेक्ष वंचिततावादी दृष्टिकोनाचा आधार घेऊन संशोधन कार्य पूर्ण करण्यात येणार आहे.

सापेक्ष वंचितता हे काही सामाजिक चळवळीस गती देणारी गोष्ट नाही हे तो सिध्दांत मांडणाऱ्यांनीही कबुल केले आहे पण आपण काहीतरी करु शकतो ही जाणीवच त्या नेत्यांमधील सामाजिक चळवळीच्या उदयासाठीआवश्यक आहे.

एम एस राव यांच्या मतानुसार धर्म शिक्षण राजकारण आणि नागरी जीवन हे घटक सापेक्ष वंचिततेशी संबंधित आहे. ते सामाजिक चळवळीच्या उदयासाठी आवश्यक असे घटक बनतात. समाजशास्त्रात सामाजिक चळवळीचे सिध्दांत प्रामुख्याने तीन प्रणालींवरुन मांडले जातात. त्या प्रणालीत सापेक्ष वंचितता, मूल्य संचयता व जनसंघटन स्त्रोत ह्याचा समावेश होतो.आपनास आपल्या हक्क व अधिकारापासून वंचित ठेवले जात आहे ही जाण बहुजनांना अस्वस्थ करणारी होती. सामाजिक संतुलन आणि समता प्रस्थापित करणारी,केवळ समायोजन साधणारी यंत्रणा म्हणून यशवंत आंबेडकरांच्या समाजकार्याकडे न पाहता ती एक परिवर्तनवादी चळवळ कशी आहे हे स्पष्ट करून सांगण्यासाठी

सापेक्ष वंचिततेचा सिध्दांत उपयोगी पडतो म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी सापेक्ष वंचितता दृष्टीकोनाचा अवलंब केला आहे.
यशवंत आंबेडकरांच्या सामाजिक कार्यामुळे नवबौध्द समाजात जाणीव जागृती निर्माण झाली.विचार करण्याची क्षमता निर्माण झाली. समस्या सोडविण्याचा दृष्टिकोन निर्माण झाला.व्यक्तिस्वातंत्र्य, माणूस म्हणून जगण्याचा समान हक्क व संधी यांविषयीची जाण निर्माण झाली.

संशोधनाचे महत्त्व :-

प्रस्तुत संशोधन हे यशवंत आंबेडकरांचे नवबौद्ध समाजाच्या विकासासाठी सामाजिक योगदानाच्या संदर्भाने करण्यात येणार आहे.यात सामाजिक परिवर्तन चळवळीतील कार्याचा समाजावर झालेल्या परिणामांचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यांचे या बाबतीतील योगदान व त्यांच्या समकालीन समाजविषयक चळवळीपेक्षा कसे वेगळे आहे हे विशेष जाणून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू हा मानवी विकास हाच राहिला आहे. आशा विचारांची व कार्याची गरज आजच्या समाजाला अत्यंत गरजेची आहे . त्यांच्या सामाजिक चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता त्यांचे कार्य सामाजिक राजकीय शैक्षणिक अशा सर्व समावेशक प्रकारचे आहे म्हणून प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व अनन्यसाधारण असणार आहे.

संशोधन मर्यादा :-

यशवंत आंबेडकरांचे नवबौद्ध समाजातील परिवर्तनवादी चळवळीचे स्वरूप व व्यापकता लक्षात घेऊन या विषयाच्या अनुषंगाने मांडणी करणे हे सामाजिक शास्त्रात सोपे काम नाही परंतु हा अभ्यास त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा आहे. अशा प्रकारच्या संशोधन प्रबंधात संपूर्ण पैलुंचा विचार होणे शक्य नाही त्यामुळे त्यांच्या कार्याचा समाजश्यास्त्रीय अभ्यास करून त्यांचे समाजबांधनीतील योगदानाचा आढावा यापुरतेच मर्यादित असणार आहे.

संशोधन कालावधी:-

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर भारतीय बौद्ध महासभेचे नेतृत्व 1957 पासुन यशवंत आंबेडकरांकडे आले तेव्हापासून ते यशवंत आंबेडकरांनी जीवनभर या मातृसंस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्य चालू ठेवले. संबंधित संशोधनात त्यांच्या 1957 पासुन ते 1977 पर्यंतच्या कालावधीतील कार्याचा आढावा घेण्याचे निश्चित करण्यात आला असून संबंधित संशोधन कार्याचे परिणाम जाणून घेण्यासाठी 2022 ते 2025 या कलावधीत हे संशोधन कार्य पूर्ण करण्यात येईल.

संशोधनाची उदिष्टे :-

1) नवबौध्द समाजाप्रती यशवंत आंबेडकरांचे सामाजिक कार्य अभ्यासणे.
2) नवसमाज निर्मितीच्या दृष्टिकोनातून यशवंत आंबेडकरांचे सामाजिक कार्य अभ्यासणे.
3) यशवंत आंबेडकरांच्या राजकीय कार्याचा समाजावर झालेला परिणाम समजून घेणे.
4) धार्मीक परिवर्तन कार्याचा समाजजीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
5) डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वणानंतर नवबौध्द समाजाच्या एकुण जडणघडणीत यशवंत आंबेडकरांच्या कार्याचा सुक्ष्म व विश्लेषणात्मक अभ्यास करणे.
6) यशवंत आंबेडकरांनी आपल्या हयातीत आयोजित केलेल्या विविध ठिकाणच्या बौद्ध धम्म परिषदांचा धार्मीक आचारसंहितेच्या दृष्टिकोनातून झालेल्या उपयोगाचा अभ्यास करणे.
7) यशवंत आंबेडकरांच्या सामाजिक आरक्षण विषयक लढ्याच्या यशस्वीतेचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :-

1) सामाजिक व राजकीय परिवर्तन चळवळीत यशवंत आंबेडकरांचे स्थान नेहमीच अग्रेसर राहिले.
2) सामाजिक शैक्षणिक आरक्षणविषयक लढ्यात यशवंत आंबेडकरांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे .
3) नवबौध्द समजाच्या प्रगती साठी यशवंत आंबेडकरांचा लढा नेहमीच महत्वपूर्ण राहीला आहे.
4) संघटनात्मक दृष्टीने नवबौद्ध समाज नेहमीच विखुरलेल्या स्वरुपात असताना त्यांचे संघटन करण्यास यशवंत आंबेडकरांनी महत्वपूर्ण योगदान दिले.
5) भारतीय बौद्ध महासभा या मातृसंस्थेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण नवबौद्ध समाजात संरचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.

ही सर्व गृहितके संबंधित संशोधनातून पडताळून पाहण्यासाठीचे प्रयत्न केले जाणार आहे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन हे समाजशास्त्रिय संशोधन पद्धतीचा आधार घेऊन संशोधन कार्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धती व वर्णनात्मक,विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. वरिल उद्दिष्टांच्या अनुषंगाने संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती व तथ्य संकलनासाठी संशोधकाचा भर प्रामुख्याने या विषयावरील उपलब्ध असलेले प्रकाशित व अप्रकाशित साहित्य,वृत्तपत्रे,पाक्षिक व मासिकांचा आधार घेऊन पुर्ण करण्यात येणार आहे.

वरील उद्दिष्टांच्या अनुषंगाने संबंधित माहिती मिळवण्याचा संदर्भ म्हणून प्रामुख्याने यशवंत आंबेडकरांचे सामाजिक व राजकीय परिवर्तन चळवळीतील कार्याचा व भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे संबंधित संस्था व व्यक्तींकडून मुलाखतीच्या माध्यमातून मिळवण्यात येणार आहे.

<u>व्यक्तिगत कागदपत्रे :-</u>

यामध्ये यशवंत आंबेडकरांच्या संदर्भातील मुळ कागदपत्रे,भा.बौ.महासभेचे ठराव.विशेषांक, स्मरणिका, मासिके व त्यांची भाषणे इ.आधार घेऊन तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

<u>सार्वजनिक कागदपत्रे :-</u>

यशवंत आंबेडकरांच्या अनुषंगाने इतरांचे लिखाण व त्यांच्या सामाजिक राजकीय चळवळीशी संबंधित लिहिलेल्या इतर साहित्याचाही आधार घेण्यात येणार आहे.

<u>पाक्षिक मासिके व नियतकालिके :-</u>

जनता, प्रबुद्ध भारत,वर्तमानपत्र,व बुद्धभुषण प्रिंटिंग प्रेसतर्फे प्रकाशित साहित्य,विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या बौद्ध धम्म परिषदांचा उपलब्ध अहवाल,विधापरिषदेतील त्यांची भाषणे,इ. आधार तथ्य संकलनासाठी घेण्यात येणार आहे.

<u>प्रत्यक्ष भेट व मुलाखती :-</u>

या विषयाचा भाग म्हणून भारतीय बौद्ध महासभेची संबंधित कार्यालये कार्यकर्ते नातेवाईक यांच्या भेटी घेवून प्रत्यक्ष मुलाखतीतून माहिती संकलित करण्यात येणार आहे.

<u>नमुना निवड :-</u>

यशवंत आंबेडकर यांच्या कार्याच्या परिणाम व समाजातील परिवर्तन जाणून घेण्यासाठी नमुना म्हणून सहेतुक नमुना निवड पद्धतीची निवड करण्यात येईल . त्यामध्ये भारतीय बौद्ध महासभा या संस्थेअंतर्गत नांदेड जिल्यातील जिल्हा अधक्ष्य (2) जिल्हा सचिव (2) जिल्हा उपाध्यक्ष (4) सरचिटणीस (2) संस्कार सचिव (8) व जिल्हा संघटक(4) व 16 तालुक्याअंतर्गत भारतीय बौद्ध महासभेची कार्यकारिणी 16×6 =96, सदस्यांच्या मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात येईल

.

प्रत्येक तालुक्यातील 16×2=32 सामाजिक व राजकीय कार्यकर्ते व 5 कुटुंबीय व्यक्ती असे एकूण 155 व्यक्तींची मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात येईल .

थोडक्यात हा अभ्यास पूर्ण करण्यासाठी जी संशोधन पद्धती वापरण्यात येणार आहे ती प्रामुख्याने उपलब्ध असलेल्या प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करून विषय मांडणी करण्यात येईल .

संशोधन आराखडा :-

यशवंत आंबेडकर यांचे नवबौध्द समाजाच्या विकासातील योगदान:
एक समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचे संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचे असुन त्यातील माहिती संकलन हे उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून पुढील सहा प्रकारणामध्ये पूर्ण करण्यात येणार आहे

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

यशवंत आंबेडकर यांचे नवबौध्द समाजाच्या विकासातील योगदान: एक समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचे प्रस्तावनेसहीत विषयाची मांडणी या प्रकारणामध्ये करण्यात येईल .

प्रकरण दुसरे :- संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

या प्रकरणात संशोधन पद्धतीविषयी मांडणी करण्यात येईल उपलब्ध असलेल्या प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येईल .

प्रकरण तिसरे :- कौटुंबिक माहिती

यशवंत आंबेडकरांची कौटुंबिक माहिती संपुर्ण संदर्भासहीत देण्यात येईल

प्रकरण चौथे :- यशवंत आंबेडकरांचे कार्य व सामाजिक शैक्षणिक परिवर्तन

यशवंत आंबेडकरांचे कार्य नवबौद्ध समजाच्या सामाजिक परिवर्तनासाठी कसे उपयुक्त ठरले आहे यांविषयीची माहिती संपुर्ण संदर्भासहीत देण्यात येईल.

प्रकरण पाचवे :- यशवंत आंबेडकरांचे कार्य व धार्मिक राजकीय क्षेत्रातील परिवर्तन

यशवंत आंबेडकरांचे राजकीय धार्मीक क्षेत्रातील कार्य याविषयी समाजश्यास्त्रीय दृष्टीने विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण सहावे :- निष्कर्ष व शिफारशी

शेवटच्या प्रकरणात प्रस्तुत संशोधना विषयी निष्कर्ष मांडण्यात येतील.

यशवंत आंबेडकरांचे समाजकार्य हे केवळ बोलघेवडे नसुन ते कृतिशील होते, समाज परिवर्तनाचे कार्य त्यांनी समर्थपणे पुर्णपणे तडीस नेण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले व आपल्या कार्याशी शेवटपर्यंत कायम एकनिष्ठ राहिले म्हणूनच त्यांच्या प्रेरणेने आजही त्यांचे असंख्य कार्यकर्ते, त्यांच्या सुविध्य पत्नी मिराताई आंबेडकर त्यांचे तिन्ही सुपुत्र मा. प्रकाश आंबेडकर, मा. भिमराव आंबेडकर मा . आनंदराव आंबेडकर हे त्यांच्याच कार्यपथावर पाऊल ठेवून समाज कार्य करीत आहेत.

यशवंत आंबेडकरांनी समाजकार्यातुन प्रबोधनाचा पाया निर्माण केला त्यांच्या योगदानामुळे धार्मीक सामाजिक राजकीय शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रातील संदर्भाची नवनिर्मिती झाली.

त्यांनी सामाजिक चळवळीच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची क्रांती घडवून आणली.

नवबौध्द समाजाला विविध क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधीचा फायदा घेऊन प्रगती करण्यासाठी चालना दिली.

परिशिष्टे

संदर्भ ग्रंथ :-

1. आगलावे प्रदीप -सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे .
   -श्री साईनाथ प्रकाशन नागपुर
2. खोब्रागडे फुलचंद्र. (2014) सूर्यपुत्र यशवंतराव आंबेडकर.
   -संकेत प्रकाशन नागपूर
3. डांगळे अर्जून -आंबेडकरी चळवळीचे अंतरंग.
4. पवार प्रकाश मा- आंबेडकरोत्तर दलित राजकारण.
5. पवार ज. वि. -सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर.
   -बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस मुंबई
6. पवार. ज.वि. - माजी आमदार भैय्यासाहेब आंबेडकर.
   -बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस मुंबई
7. नंदेश्वर संदीप - सूर्यमालेतील निखळ तारा - सूर्यपुत्र यशवंत उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर.
8. भुरे भिमराव संपादक - सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी विशेषांक.
   -प्रकाशक : भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा नांदेड
9. जंजाल प्रकाश (2019) लोकनेते भैय्यासाहेब आंबेडकर.(रमाई प्रकाशन)

मार्गदर्शक
डॉ.पी.के.मगर.
संशोधकमार्गदर्शकव
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शहीद भगतसिंग महाविद्यालय किल्लारी
संशोधन केंद्र:- महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर.

संशोधक
जोंधळे आर आर.